महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग, मंत्रालय, ४ था मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
nirmal.chaudhari@gov.in

क्रमांक :- टिपीबी - ४३२२/प्र.क्र.१२९/२०२२/नवि-११ दिनांक :- 0८/०६/२०२३

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- Concurrence to reissue lapsed IOD for continuation of 50% premium benefit up to 31/12/2023.

संदर्भ :- १) महानगरपालिकचे पत्र क्र. ChE/ DP/२१६७५/Gen., दि. ३०/११/२०२२
२)शासनाचे पत्र क्र. टिपीबी-४३२२/प्र.क्र.१२९/२०२२/नवि-११,दि.२३/१२/२२
३)मा. खासदार श्री. गोपाळ शेट्टी यांचे दि. ३०/१२/२०२२ रोजीचे मा. उपमुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित पत्र.
४)महानगरपालिकेचे पत्र क्र. ChE/DP/३८८८/ Gen, दि. १६/०५/२०२३

महोदय,

उपरोक्त विविध पत्रांचे संदर्भासंबंधी विषयांकीत प्रकरणी खालील बाबींचे अवलोकन करावे.

१) शासनाच्या दि. १४/०१/२०२१ रोजीच्या निदेशानुसार विविध अधिमूल्य व चार्जेस इत्यादी बाबत दि. ३१/१२/२०२१ पर्यंत मंजूर प्रस्तावांसाठी व प्रत्यक्ष जमा रक्कमेवर ५०% सवलत देण्यात आली होती. सदर सवलत केवळ ३१/१२/२०२१ पर्यंत वैध होती.

२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विकास प्रस्तावांना परवानगी देण्यासाठी MMC Act मधील कलम ३४६ नुसार IOD देण्यात येते. सदर IOD ची वैधता १ वर्षांची असून या कालावधी बांधकाम परवानगी ( CC) प्राप्त करुन न घेतल्यास सदर IOD म्हणजेच प्रस्ताव मंजूर रद्द होते व अशा परिस्थितीत नव्याने प्रस्ताव सादर करुन नव्याने IOD घेणे आवश्यक आहे.

३) नव्याने IOD घेत असताना, त्या दिवशी लागू असलेली नियमावली व धोरण इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

४) महानगरपालिकेने त्यांच्या दि. १६/०५/२०२३ च्या पत्रामध्ये दि. ३१/१२/२०२१ पूर्वी मंजूरी दिलेल्या IOD च्या प्रकरणी १ वर्षामध्ये बांधकाम परवानगी ( CC) प्राप्त न केल्यामुळे अशा रद्द झालेल्या प्रस्तावांना नवीन परवानगी (IOD) देताना दि. १४/०१/२०२१ च्या धोरणानुसार अनुज्ञेय ५०% सवलतीचा लाभ देण्याबाबत शासनाची सहमती अपेक्षिलेली आहे.

उपरोक्त बाबींचे अवलोकन करता, MMC Act मधील कलम ३४५ नुसार IOD ची कालमर्यादा १ वर्षाची असणे व शासनाच्या दि. १४/०१/२०२१ च्या धोरणानुसारची सवलत १ वर्षात CC प्राप्त न झालेल्या प्रस्तावांना लागू करणे असे दोन मुद्दे समाविष्ट असल्याचे दिसते.

यामधील IOD वैधतेची कालमर्यादा वाढविण्याची बाब प्रशासकीय असून ती नगर विकास-१ च्या अखत्यारीत असून दि. १४/१/२०२१ चे शासन धोरणाची मुदत दि. ३१/१२/२०२१ रोजी संपुष्टात आली असून सध्या अस्तित्वात नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, महानगरपालिकेने त्यांचे पत्राद्वारे MMC Act अथवा विकास नियंत्रण नियमावली-२०३४ किंवा शासन धोरण यापैकी कशामध्ये व त्यामधील नेमक्या कोणत्या तरतूदीमध्ये शासनाकडून सवलत / सहमती आवश्यक आहे याचा बोध होत नाही. सबब, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी त्यानुसार तपासणी करुन नेमकी तरतूद व शासनास असलेले अधिकार व त्यासाठी शासनाच्या सहमती / मंजूरीची आवश्यकता याबाबत स्पष्ट प्रस्ताव सादर केल्यास शासनस्तरावरुन त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेणे शक्य होईल, असे आपणास कळविण्याच्या मला सूचना आहेत.

आपला,

( अमर पाटील )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- निवडनस्ती ( नवि-११)